महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

पनवेल व उरण (जि.रायगड) डेडीकेटेड फ्रेट कॉरीडॉर प्रकल्पांतर्गत बांधकामधारकांना देण्यात येणा-या विकल्पावर फेरविचार करण्याबाबत

(१) ३२४४३ (११-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल व उरण (जि.रायगड) तालुक्यातील डेडीकेटेड फ्रेट कॉरीडॉर प्रकल्पांतर्गत बांधकामधारकांनी देण्यात येणा-या विकल्पावर फेरविचार करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास मा.प्रशासक तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) रायगड अलिबाग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदर प्रकल्पांतील विकल्पावर तालुक्यातील आवश्यक त्या जमिनींचे बांधकामाचे शासनामार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणात पात्र/अपात्र लाभार्थ्यांची यादीत अनियमितता असून अनेक पात्र बांधकामधारकांना अपात्र ठरविण्यात आले आहे हे खरे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकल्पातंर्गत बाधित होणा-या बांधकामधारकांना देण्यात येणाऱ्या विकल्पात अनेक त्रुटी असल्यामुळे बांधकामधारकांनी सदर प्रकल्पांतर्गत देण्यात येणा-या विकल्पाला विरोध दर्शविला आहे हे खरे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त तालुक्यातील डेडीकेटेड फ्रेट कॉरीडॉर प्रकल्पांतर्गत बांधकामधारकांनी देण्यात येणा-या विकल्पाबाबत फेरविचार करण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) पनवेल व उरण (जिल्हा रायगड) या तालुक्यातील डेडीकेटेड फ्रेंट कॉरीडॉर प्रकल्पांतर्गत (१) लेव्हल क्रॉसिंग २ वर रेल्वे कि.मी.क्र.८४/९ ते ८५/० मध्ये, (२) लेव्हल क्रॉसिंग ३ रेल्वे कि.मी. ८५/७ मध्ये व (३) लेव्हल क्रॉसिंग ९-सी भाग निळजे ते तळोजा कि.मी.५५/८०० मध्ये अशी एकूण ३ रेल्वे उड्डाणपुलांची कामे प्रगतीत आहेत. सदर कामांसाठी खाजगी तत्वावर थेट खरेदीद्वारे भूसंपादन करण्यात आलेले असून या रेल्वे उड्डाणपुलांच्या प्रकल्पांकरिता लागणा-या जमिनीसाठी पुनर्वसन प्रस्ताव प्रशासक तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) रायगड, अलिबाग यांच्याकडे प्रगतीत नाही.
(२),(३),(४),व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील नगरपालिका व नगरपंचायतीतील कर्मचाऱ्यांना आरोग्य विमा संरक्षण मिळण्याबाबत.

(२) ३२७७५ (१७-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३८५ नगरपालिका व नगरपंचायतीतील कर्मचारी कोरोनाकाळात अत्यावश्यक सेवेत जीव ओतून काम

करीत असून त्यांना इतर विभागातील कर्मचाऱ्यांप्रमाणे आरोग्य विमा संरक्षण नसल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोनाकाळात अत्यावश्यक सेवा बजावत असताना २२ नगरपंचायत कर्मचाऱ्यांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदरील कर्मचाऱ्यांना आरोग्य विमा संरक्षण देण्यासह कोरोनामुळे मृत झालेल्या या कर्मचाऱ्यांच्या कुटूंबांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (०५-०९-२०२२) : (१) नाही, हे खरे नाही.

वित्त विभागाच्या दिनांक २९.०५.२०२० व नगर विकास विभागाच्या दिनांक ०४.०८.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील "अ" व "ब" महानगरपालिका वगळता "क" व "ड" महानगरपालिका तसेच सर्व नगरपरिषद / नगरपंचायती क्षेत्रातील कोविड विरोधी मोहिमेमध्ये कर्तव्य पार पाडताना कोरोनाची लागण होऊन मृत्युमुखी पडलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना रुपये ५०.०० लाख इतक्या रकमेचे सानुग्रह सहाय्य / विमा कवच लागू करण्यात आले आहे.
(२) अंशत: खरे आहे.

कोरोना काळात नगरपरिषद / नगरपंचायत मधील एकूण १३२ अधिकारी / कर्मचाऱ्यांचा मृत्यु झाला आहे.
(३) दिनांक ११.०२.२०२२ रोजीच्या शासन निर्णय अन्वये नगरपरिषद / नगरपंचायत व महानगरपालिका मधील कोरोनाची लागण होऊन मृत्यु झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या वारसांना रुपये ६४.५० कोटी सानुग्रह अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तसेच उर्वरीत अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाची झालेली दुरवस्था.

(३) ३२७९७ (११-०१-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुख्य महामार्गासह धुळे जिल्ह्यातून जाणाऱ्या मुंबई-आग्रा महामार्गावर पावसामुळे खड्डेमय झाल्याचे दिनांक ७ सप्टेंबर, २०२१ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील प्रमुख महामार्गांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(३) असल्यास, कधीपर्यंत महामार्गाची दुरुस्ती करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) धुळे जिल्ह्यातून जाणाऱ्या मुंबई- आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्र.३ केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

सदर महामार्गाच्या सुमारे ९६.५० कि.मी. लांबीमधील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत सन २०१२ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. सदर लांबी सवलत कालावधीत असल्याने संबंधित कंत्राटदारामार्फत गतवर्षीच्या पावसाळयात रस्त्यावर पडलेल्या खड्डयांची दुरुस्ती व नियमित देखभाल दुरुस्ती करण्यात आली आहे, असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,धुळे यांनी कळविले आहे.

धुळे जिल्हयातून जाणा-या इतर राष्ट्रीय महामार्गांवर किरकोळ खड्डे पडले आहेत, तथापी महामार्गाची दुरावस्था झालेली नाही.
(२) सदर बाबत मा.मुख्यमंत्री महोदय,महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली दि.२९.०९.२०२१ रोजी सर्व संबंधितांची आढावा बैठक घेण्यात येऊन त्यामध्ये सर्व राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील खड्डे तात्काळ भरुन रस्ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्याबाबत आदेश देण्यात आले.

(३) धुळे जिल्ह्यातून जाणाऱ्या मुंबई- आग्रा महामार्गावरील सुमारे २३ कि.मी. लांबीच्या मुख्य दुरुस्तीचे काम सदयस्थितीत हाती घेण्यात आले असून आजमितीस सुमारे ७.५० कि.मी.लांबीच्या रस्त्याची दुरुस्ती पूर्ण करण्यात आली आहे व उर्वरीत दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे,असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,धुळे यांनी कळविले आहे.

तसेच धुळे जिल्हयातून जाणा-या इतर राष्ट्रीय महामार्गांवरील खड्डयांची दुरुस्ती मे २०२२ अखेर पूर्ण करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मोरपंखांची विक्री व त्यावर जीएसटी आकारल्याबाबत

(४) ३३०८३ (११-०१-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद वनपरिक्षेत्र अधिकारी व वनविभागाच्या पथकाने औरंगाबाद शहरात पाच हजार मोरपंख जप्त केल्याचे दिनांक २९ जुलै,२०२१ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनविभागाने मोर पंखाबाबत झाडाझडती करताना मोरपंख व्यवहारात जीएसटी आकारण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत केलेल्या सर्वकष चौकशीत काय आढळून आले आहे व कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०८-२०२२) : (१), (२) व (३) औरंगाबाद शहरात गस्ती दरम्यान वन परिक्षेत्र अधिकारी, औरंगाबाद यांना ६ इसम मोरांच्या पंखाची विक्री करित असल्याचे निदर्शनास आले.

उपरोक्त मोर पंखाची विक्री करणाऱ्या व्यक्तींच्या चौकशी दरम्यान त्यांनी सदर मोर पंख हे राधेकृष्णा इंटरप्रायजेस, अहमदाबाद व हिरा इंटरप्रायजेस, ढोलकीखार, आग्रा यांचेकडून खरेदी केले असून देयकामध्ये ५% जीएसटीची रक्कम वसुल करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे.

वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या कलम ४३ (३) (क) नुसार मोर पंखाच्या वाहतुकीस तसेच कलम ४४ नुसार मोर पंखाचा व्यापार करण्यास सुट देण्यात आली असल्यामुळे सदर व्यक्तींवर कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

बीड (ता.गेवराई) जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे रस्त्यांचे व पूलांचे नुकसान झाल्याबाबत

(५) ३३३५२ (११-०१-२०२२). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील गेवराई विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांचे व पूलांचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून सदर रस्त्यांच्या व पूलांच्या दुरुस्तीसाठी साधारणपणे २७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याचे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय, आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेवराई विधानसभा मतदार संघात वाहून गेलेल्या पूलांमुळे व रस्त्यांमुळे अनेक दुर्दैवी घटना घडल्या असून अतिवृष्टीमुळे वाहून गेलेल्या पूलांची व रस्त्यांची दुरुस्ती होणे अपेक्षित असून संबंधित विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचे निदशर्नास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, येणा-या पावसाळयापूर्वी गेवराई विधानसभा मतदारसंघातील अतिवृष्टीमुळे वाहून गेलेल्या पूलांच्या व रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे आहे ?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) अतिवृष्टीमुळे रस्ते व पूलांचे नुकसान झाले आहे. हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
पूरहानी दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत तात्पुरत्या दुरुस्तीसाठी रु. ४९३.०० लक्ष इतक्या रक्कमचा कार्यक्रम मंजूर केला आहे. तसेच सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात रु.३३९७.५० लक्ष इतक्या रक्कमेच्या कार्यक्रम मंजूर करण्यात आला आहे.
(३) पूरहानी दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आलेली कामे सद्यस्थितीत प्रगतीत आहेत.
सन २०२२-२३ मधील अर्थसंकल्पात समाविष्ट कामे ही अंदाजपत्रक स्तरावर असून कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामे कार्यन्वीत करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वडगावशेरी (जि.पुणे) येथील लोहगावच्या पाणी प्रश्नाबाबत

(६) ३३८८२ (०२-०२-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडगावशेरी (जि.पुणे) लोहगाव हे गाव नव्याने पुणे महानगरपालिका समाविष्ट झाले असून, समाविष्ट झालेल्या गावांना सर्व सुख-सुविधा पुरविणे हे पुणे महानगरपालिकेच्या अखत्यारीतील बाब आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोहगाव मध्ये पिण्याच्या व सांडपाण्याची परिस्थिती अत्यंत गंभीर झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी पुणे महानगरपालिका लोहगावातील पाण्याच्या प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०५-०९-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
लोहगाव हा भाग सन २०१७ मध्ये समाविष्ट ११ गावांपैकी असून त्या ठिकाणी ग्रामपंचायतीची पूर्वीपासून चालू असलेल्या योजनेअंतर्गत आजमितीस पाणीपुरवठा करण्यात येत आहे. लोहगाव मधील सुमारे ४०% भागाला आजमितीस ७.०० एम.एल.डी. इतका पाणीपुरवठा करण्यात येतो. यापैकी काही भागात दिवसाआड व काही भागात ३ ते ४ दिवसांनी पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच लोहगाव पुणे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट होण्याअगोदर लोकवस्तीच्या मानाने मैलापाण्याचे जाळे पुरेशा प्रमाणात विकसित झालेले नाही. त्यामुळे मैलापाणी ओढयातून वाहून जात आहे.
(३) पुणे महानगरपालिकेत सन २०१७ मध्ये समाविष्ट झालेल्या ११ व सन २०२१ मध्ये समाविष्ट झालेल्या २३ अशा एकूण ३४ गावांसाठी पाणी पुरवठा योजनेतील डिझाईन, देखरेख संपूर्ण प्रकल्प व्यवस्थापन करणे या कामासाठी तज्ञ सल्लागार संस्थेची नेमणूक करण्यात आली असून सदर संस्थेमार्फत काम चालू आहे. सद्यस्थितीत उपलब्धतेनुसार पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच हरणतळे येथे नव्याने २५ लक्ष लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाकीचे काम चालू आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर लोहगावमधील पाणीपुरवठा सुरुळीत होण्यास मदत होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर येथील इमारत कोसळल्यामुळे मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना आर्थिक मदत मिळण्याबाबत

(७) ३४२११ (०१-०२-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर मध्ये मोहिनी पॅलेस आणि साई शक्ती अपार्टमेंट ह्या अनुक्रमे दिनांक १५ मे, व २९ मे, २०२१ रोजी

कोसळल्याने १२ व्यक्तीचा मृत्यू झाला मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना राज्य शासनाकडून ५ लाख रुपये आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी लोकप्रतिनिधीनी शासनाकडे दिनांक ७ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पारस इमारतीचा स्लॅब कोसळून एका व्यक्तीचा मृत्यू सुद्धा झाल्याचे दिनांक २५ ऑक्टोबर २०२१ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उल्हासनगर मधील धोकादायक इमारतीचे पुनर्निर्माण करण्यांसाठी FSI किंवा त्यांनी जेवढा FSI वापरला आहे तेवढा FSI पुनर्निर्माण करण्यासाठी द्यावा अशी विनंती सुद्धा लोकप्रतिनधीनी राज्य शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, ठाणे जिल्हाधिकारी यांनी मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना आर्थिक मदत मिळावी यासाठी अहवाल दिनांक १४ जून, २०२१ रोजी राज्य शासनाकडे पाठविला असून शासनाच्या वतीने अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यांत आली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास, मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना आर्थिक मदत मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) व (५) सदर घटना ही मानवनिर्मित आपत्तीमधील निवासी इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेतील अटी/शर्तींची पूर्तता करीत नसल्याने मदतीकरिता पात्र ठरत नाही असे मदत व पुनर्वसन विभागाने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील कचरावेचक संस्थेला मुदतवाढ देऊन पुन्हा कंत्राट देण्याबाबत

(८) ३४४६८ (१७-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्टेनरमुक्त पुणे या संकल्पनेतून शहरातील कागद, काच, पत्रा इ. कष्टकरी पंचायत आणि पुणे महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने सन २००८ मध्ये स्वच्छ सेवा सहकारी संस्थेची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील १३ वर्षापासून सदरहू संस्था, शहरातील कचरापेटया काढून टाकून घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्याची अभिनव व्यवस्था करीत असून सन २०२० व २०२१ च्या कोरोना काळात देखील संस्थेने अव्याहत्तपणे काम केल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुदत समाप्तीनंतर सदरचे काम या स्वच्छ सेवा सहकारी संस्थेला देण्याऐवजी महापालिका प्रशासनाकडून एका खासगी कंपनीला काम देण्यात येणार असल्यामुळे संस्थेकडील साडेतीन हजार कचरा वेचकांचा रोजगार बुडून त्यांचेवर उपासमारीची पाळी येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, अन्य खाजगी कंपनीला काम (कंत्राट) देण्याऐवजी सदर संस्थेच्या मुदतीनंतरही संस्थेलाच काम देण्याबाबत पुणे शहरवासियांकडून तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीकडून तशी मागणी महापालिका प्रशासन व शासनाकडे करण्यात आली असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०५-०९-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) हे खरे आहे.

(५) पुणे महानगरपालिका सभा ठराव क्र.६५१ दि.२२/११/२०२१ नुसार स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्थेस दि. १३/०८/२०२१ ते दि. २५/१०/२०२२ पर्यंत कामकाज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

राज्यात मुंबई महापालिकेच्या ६४ खाजगी प्राथमिक अनुदानित हजारो शिक्षक निवृत्तीनंतर मिळणाऱ्या विविध लाभापासून वंचित असल्याबाबत

(९) ३४६१३ (०२-०२-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबई महापालिकेच्या ६४ खाजगी प्राथमिक अनुदानित शाळेतील हजारो शिक्षक निवृत्तीनंतर मिळणाऱ्या विविध लाभापासून वंचित असल्याने आर्थिक विवंचनेत असल्याची बाब माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अनेक शिक्षक गेल्या १० ते १२ वर्षापासून न्याय मागत असून महापालिकेकडून त्यांना न्याय मिळत नसल्याने मराठी अभ्यास केंद्राच्यावतीने मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दाद मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयात गेलेल्या एक शिक्षिकेला सर्व लाभ महानगरपालिका देत असताना इतर शिक्षकांना सदर लाभ न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) अशा आशयाच्या निवेदनाची नोंद आढळून आली नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय येथे याचिका प्रलंबित आहेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अनुकंपा उमेदवारांच्या नियुक्तीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

(१०) ३५०१७ (१७-०१-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ५६ हजार पेक्षा अधिक अनुकंपा उमेदवारांच्या नियुक्तीची प्रकरण प्रलंबित असून अनुकंप धारक उमेदवारांना नियुक्तीपर्यंत वयोमर्यादा संपत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची भरती बंद केली असून दिनांक ११ डिसेंबर, २०२० चा शासन निर्णय रद्द केल्याने तृतीय श्रेणीतील कागदपत्राच्या पुर्तते अभावी अनुकंप भरती प्रक्रियेचा उमेदवारांना अनुकंपाचा लाभ मिळत नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग १ व २ च्या अनुषंगाने शासनाने अनुकंपधारक उमेदवारांना प्राधान्याने घेऊन ज्या उमेदवारांकडे शैक्षणिक कागदपत्रे किंवा अन्य कागदपत्रे नसतील त्यांना चर्तुथ श्रेणी पदावर घेण्याबाबत कोणती कार्यवही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०९-२०२२) :(१) हे खरे नाही,

अनुकंपा नियुक्तीसाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडील सामायिक प्रतिक्षासूचीनुसार दि.०१.०१.२०२२ रोजी एकूण ९,५०८ उमेदवार अनुकंपा नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत.

(२) राज्यातील मान्यताप्राप्त सर्व खाजगी अनुदानित/अंशत:अनुदानित माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळांतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पदांऐवजी शाळांना ठोक स्वरुपात शिपाई भत्ता अनुज्ञेय करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने दि.११ डिसेंबर,२०२० च्या शासन निर्णयान्वये घेतलेला आहे.
(३) प्रचलित अनुकंपा धोरणानुसार राज्यातील चतुर्थ श्रेणी पदावर अनुकंपा नियुक्ती विहित अटी व शर्तीनुसार करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वडाळा येथील संक्रमण शिबिरात होत असलेल्या त्रासाबाबत

(११) ३५५२० (११-०१-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वसाहत धोकादायक असल्याने सन २०१६ रोजी सदर इमारत खाली करण्यात आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसाहतीमध्ये राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना वडाळा येथील संक्रमण शिबिरात तात्पुरत्या स्वरूपात राहण्याची व्यवस्था केली आहे हे खरे आहे का,
(३) असल्यास, सदर संक्रमण शिबिरात होत असलेल्या त्रासासंदर्भात वारंवार तक्रारी करून देखील त्यांना न्याय मिळत नाही आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, यावर शासनाच्या वतीने कोणती कारवाई करण्यात आली आहे, व नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) कस्तुरबा रुग्णालयातील कामगारांच्या वसाहतीतील इमारत क्र. ५५ व ६०/बी अनुक्रमे सन २०१५ व सन २०१८ मध्ये रिक्त करण्यात आल्या व निष्कासित करण्यात आल्या आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) सदर इमारतीत राहणाऱ्या कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय वडाळा व मानखुर्द येथे तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) सदर बाबत कस्तुरबा रुग्णालयामार्फत दैनंदिन साफसफाईकरिता सफाई कामगार उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच, कस्तुरबा रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांच्या संक्रमण शिबिरात सांडपाणी, मलनि:सारण, जमा कचरा याबाबतच्या तक्रारींचे निराकरण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एफ/उत्तर विभागामार्फत करण्यात येते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

औंध जिल्हा रुग्णालय येथील अग्निशामक यंत्रणा कार्यान्वित नसल्याबाबत.

(१२) ३६३२१ (०२-०२-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरात रुग्णालयांमध्ये आग लागून अनेक रुग्ण व नागरिक नाहक बळी जात असल्याने शासनाने सर्व सरकारी व खाजगी रुग्णालयांना फायर ऑडीट करून अहवालातील त्रुटी तात्काळ दूर करण्याचे निर्देश देण्यात आले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहरात एकूण ४७३ रुग्णालये असून त्यापैकी ११० रुग्णालयांचे फायर ऑडीट झाले नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच शहरातील २६६ रुग्णालयांमध्ये ३२ खाजगी एजन्सीमार्फत फायर ऑडीट झाले असून त्यामध्येही अनेक रुग्णालयांच्या अग्निशामक यंत्रणेमध्ये गंभीर त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, औंध जिल्हा रुग्णालयात अद्यापही अग्निशामक यंत्रणाच कार्यान्वित नसल्याची बाब माहे नोव्हेंबर २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली असून, औंध जिल्हा रुग्णालयाचे जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार १९ मे २०२१ रोजी पिंपरी-चिंचवड अग्निशामक दलाने फायर ऑडीट केले असून त्याबाबतचा अहवाल रुग्णालय प्रशासनाकडे सोपविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणास चार महिन्यांचा कालावधी उलटूनही सदर ठिकाणी अग्निशामक यंत्रणा कार्यान्वित करण्याकरिता व भविष्यातील दुर्घटना रोखण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०९-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) ६४ रुग्णालये ही बंद/स्थलांतरीत आढळल्याने व ६६ रुग्णालयांचे अग्निपरिक्षण करण्याबाबत संबंधितांकडून प्रतिसाद मिळू शकला नसल्याने त्यांचे फायर ऑडीट झाले नाही.
(३) हे खरे नाही.
३२ शासन मान्य फायर लायन्सन्स एजन्सीकडून फायर ऑडीटचे काम करुन घेण्यात आले आहे. किरकोळ स्वरुपातील त्रुटी आढळून आल्या आहेत.
(४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अग्निशामक विभागाकडून दि. २७/१/२०२१ रोजी औंध जिल्हा रुग्णालयाचे फायर ऑडीट करण्यात आले असून सदर ऑडीट अहवाल दि.५/२/२०२१ रोजी रुग्णालय प्रशासनाकडे सादर करण्यात आला आहे. सदर रुग्णालयाचे अग्निशमन यंत्रणा उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेचे व खाजगी कोविड रुग्णालयाचे अग्निशामक विभागाकडून फायर ऑडीट केले आहे. फायर ॲक्ट नुसार उक्त रुग्णालयांना फायर ऑडीट मधील त्रुटींची पुर्तता करण्याकामी (दि.३०/०५/२०२१ रोजी "जे नोटीस" दि. २०/०७/२०२१ व दि.१५/११/२०२१ रोजी स्मरणपत्र देण्यात आले आहे.
६) प्रश्न उद्भवत नाही.

सोनपेठ-शिरसी-शिरसाळा (ता.जिंतूर,जि.परभणी) या हद्दीतील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

(१३) ३७६५१ (२०-०४-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोनपेठ-शिरसी-शिरसाळा (ता.जिंतूर,जि.परभणी) या हद्दीतील रस्त्यांच्या कामामध्ये मुरमा ऐवजी काळी माती टाकली असून रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे सदर प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार दाखल करण्यात येऊन कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामामध्ये मुरमा ऐवजी मातीचा उपयोग केल्याने कल्याण टोल इंफ्रास्ट्रक्चर व त्यावर समन्वयक म्हणून कार्यरत असणाऱ्या इंदोर येथील मंगलम असोसिएट यांच्या कार्यावर प्रश्न उपस्थित होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्त्याच्या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने मंगलम असोसिएट, इंदोर यांची समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात येऊन देखील याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आल्याने, सदर प्रकरणी तक्रार कोणाकडे करण्यात यावी, असा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित कल्याण टोल इंफ्रास्ट्रक्चर तसेच विभागातील दोषी अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

करोनाचा संसर्ग झपाट्याने वाढत असताना देखील नागरीक चाचणी करत नसल्याबाबत

(१४) ३७९२८ (२५-०४-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करोनाचा संसर्ग झपाट्याने वाढत असताना अनेक नागरिक चाचणी करून घेत नाही तसेच परस्पर उपचार घेतात. त्यामुळे प्रशासनाला नेमकी माहिती मिळत नाही आणि काळजी न घेतल्याने हे रुग्ण संसर्ग पसरवत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापालिका आरोग्य यंत्रणेला माहिती न देता संशयित करोना रुग्णांवर परस्पर उपचार केल्यास, लक्षणे असतानाही रुग्णांना चाचणी न करण्याचा सल्ला दिल्ल्याने संबंधित खासगी वैद्यकीय अधिकारी आणि रुग्णालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) व (२) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल रिसर्चकडून (आय.सी.एम.आर.) दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी प्राप्त पत्रान्वये ज्या संशयितांना कोविड-१९ ची लक्षणे नसतील त्यांची चाचणी करण्यात येत नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

धारुर (जि.बीड) तालुक्यातील रस्त्यांच्या कामाची ई-निविदा होऊन रस्त्याचे काम पुर्ण करण्याबाबत

(१५) ३८२३२ (१९-०४-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणी- आमला - कान्नापुर - म्हतारगाव रस्ता एमडीआर -५०(एमएसएच-१६ कुंडी ते मुंगी रस्ता) (ता. धारूर जि.बीड) या कामांची ई-निविदा होऊन सा.बां.विभाग, अंबेजोगाई जि. बीड यांच्या मार्फत दिनांक २५ जून, २०१९ रोजी वा त्यासुमारास कार्यारंभ आदेश दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम पुर्ण झाले आहे काय, व त्यानुषंगाने आजपर्यंत किती खर्च करण्यात आला आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) कोविडच्या प्रादूर्भावामुळे व स्थानिक शेतक-यांच्या विरोधामुळे कामाच्या भौतिक प्रगतीवर परिणाम झाला. सद्यस्थितीत सदर रस्त्याचे रुंदीकरणाचे काम प्रगतीत आहे. कामावरील खर्च निरंक आहे.

शिरुर (जि.बीड) तालुक्यातील रामा- २०९ ते तांदुळवाडी - उदरी रस्त्यांची सुधारणा करण्याबाबत

(१६) ३८२४६ (१९-०४-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर (जि.बीड) तालुक्यातील रामा- २०९ ते तांदुळवाडी - उदरी रस्त्यांची सुधारणा करणे प्रजिमा - ४४ कि.मी. ०/०० ते १/०० व ५/०० ते ७/०० ता.धारूर जि.बीड या कामाची ई- निविदा होवुन सा.बा. विभाग, अंबेजोगाई जि.बीड यांनी दिनांक २५ जून, २०१९ रोजी कार्यारंभ आदेश दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे काम पुर्ण झाले आहे काय व त्यानुषंगाने या कामावर आजपर्यंत किती खर्च करण्यात आलेला आहे ?
(३) अद्याप रस्त्याचे काम पूर्ण झाले नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर काम पुर्ण झाले असुन सदर कामावर मार्च, २०२२ अखेर रु.४२.०० लक्ष इतका खर्च झालेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्ह्यातील हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत मंजुर रस्त्यांची लांबी वाढविण्याबाबत

(१७) ३८२६१ (१९-०४-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत बाग पिंपळगाव- तळवडा - टाकरवण - सुर्डी या मंजुर रस्त्यांची लांबी वाढविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक १ जुलै, २०२१ रोजी वा त्या सुमारास मा. मंत्री (सा.बां. उपक्रम वगळुन) यांना निवेदन दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) दिनांक १७.०३.२०२२ च्या शासन निर्णयान्वये राजेगाव, गव्हाणथडी, हिवरा, वाघोरा, काळेगाव, थडी, डुब्बाथडी, सुलतानपुर, पुरषोत्तमपुरी, सादोळा ता. माजलगाव, जि. बीड हा इजिमा दर्जाचा रस्ता प्रजिमा ७७ असा दर्जोन्नत करण्यात आला आहे.
सदर लांबी हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत बाग पिंपळगाव-तळवडा-टाकरवण ते सुर्डी रा. मा. ५० या कामात समाविष्ट करण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन नाही.
निधी निकष व प्राधान्य क्रमानुसार सदर रस्त्याचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

माजलगाव (जि.बीड) या रस्त्याच्या कामास मंजुरी देण्याबाबत.

(१८) ३८३१३ (१०-०४-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रस्ते विशेष दुरूस्ती (गट "ब" व "क") अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग- ६१ ते मंगरूळ क्रं.१ ता. माजलगाव जि.बीड या रस्त्याच्या कामास मंजुरी देण्याबाबत लोकप्रतिनिधीने दिनांक १५ जुलै, २०२१ रोजी वा त्या सुमारास मा. मंत्री (सा.बां.) यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे काय व शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१७-०८-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) विशेष दुरुस्ती अंतर्गत प्राप्त प्रस्ताव निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार मंजुर करणेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सालई-माहुली (ता. पारशिवनी, जि. नागपूर) या मार्गावरील पुल अल्पावधीतच कोसळल्याबाबत

(१९) ३८३५८ (२८-०३-२०२२). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालई-माहुली (ता. पारशिवनी, जि. नागपूर) या मार्गावरील पुल मध्यप्रदेशातील चौराई धरणातील पाणी पेंच नदीत सोडल्याने अल्पावधीतच पुल कोसळल्याने शासनामार्फत चौकशी समिती नेमण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटना घडून तसेच चौकशी समिती नेमुन १ वर्षापेक्षा जास्त कालावधी होवूनही अद्याप चौकशीची कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने चौकशी करण्यात दिरंगाई करणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) चौकशी समितीने अहवाल शासनास सादर केला असून, सदर अहवालाच्या अनुषंगाने अधिकची माहिती समितीकडून मागविण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नारायणगांव ओझर (ता.जुन्नर, जि.पुणे) रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत.

(२०) ३८४०७ (१९-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नारायणगांव ओझर (ता.जुन्नर, जि.पुणे) मार्गे ओतुर दरम्यानच्या २० किमी रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणाचे मंजूर काम पूर्ण झाले असून यामधील सदरहू रस्त्याच्या ओझरजवळील मुक्तादेवी मंदीर ते यंधेमळा हिवरेखुर्द दरम्यानच्या एक कि.मी.रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम मागील काही वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच मुक्तादेवी ते यंधेमळा दरम्यानच्या रस्त्याचे खडीकरणाचे व डांबरीकरणाचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी यंधे हिवरे येथील रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याने रहदारीसाठी शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरीक आणि शेतकऱ्यांची होत असलेली गैरसोय दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) होय खरे आहे.

(२) व (३) स्थानिक ग्रामस्थांनी रस्त्याच्या हद्दीबाबत हरकत घेऊन विरोध केल्याने कामास विलंब झाला.सदस्थितीत मुक्तादेवी मंदीर ते यंधेमळा हिवरेखुर्द या प्रश्नांकित लांबीमध्ये काम पूर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे वन विभागाने महामेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.यांना वृक्ष पुनर्रोपणासाठी दिलेल्या परवानगीची अंमलबजावणी करण्याबाबत

(२१) ३८४३३ (१०-०४-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे वन विभागाने पुणे महामेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना कामात अडथळा ठरणारे वृक्ष पुनर्रोपणसाठी दिलेल्या परवानगीच्या अटी शर्थीची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जानेवारी-२०२२ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, या प्रकारणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०८-२०२२) :((१) हे खरे आहे.

पुणे महामेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचेमार्फत त्यांना कामात अडथळा ठरणाऱ्या वृक्षांचे पुनर्रोपण मौजे पाचगाव पर्वती, वारजे व कोथरुड येथील वनक्षेत्रात करणेकरिता वनविभागामार्फत दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी, भांबुर्डा यांनी पाहणी केली असता, सदर प्रकरणी पुनर्रोपण करतेवेळी स्थानिक प्रजातींच्या वृक्षांचे पुनर्रोपण करणे, अशा सूचना असताना पुणे महामेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचेमार्फत वनक्षेत्रात काही प्रमाणात विदेशी प्रजातींचे पुनर्रोपण केल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच, झाडांचे पुनर्रोपण करतेवेळी कमी खोलीचे खड्डे घेतल्याने झाडे कोलमडून पडलेली आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत पुनर्रोपण केलेल्या वृक्षांपैकी कमी प्रमाणात वृक्ष जिवंत असल्याचे दिसून येत आहे.

(२) पुणे महामेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना महामेट्रोच्या प्रकल्प कामात अडथळा ठरणाऱ्या वृक्षांची तोड करणे व पुनर्रोपण करणेबाबत वृक्ष प्राधिकरण समिती, पुणे मनपा यांना उपवनसंरक्षक, पुणे वन विभाग यांच्या दि.१३.०१.२०२० रोजीच्यापत्रान्वये परवानगी देण्यात आली असून अटी व शर्थींचे काटेकोरपणे पालन करणेबाबत कळविण्यात आले आहे.

सदर प्रकरणी महामेट्रो प्रकल्पात अडथळा ठरणाऱ्या वृक्षांचे पुनर्रोपण करणेकरिता वनविभागामार्फत वरीलप्रमाणे सुचनांच्या अनुषंगाने वनपरिक्षेत्रातील जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सबब, महामेट्रोने केलेल्या पुनर्रोपनाची जबाबदारी ही वृक्ष प्राधिकरण समिती, पुणे मनपा व पुणे महामेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. पुणे यांची संयुक्तरित्या असून वनपरिक्षेत्र अधिकारी, भांबुर्डा यांच्या दि. १३.०८.२०२१ रोजीच्या पाहणी अहवालाच्या अनुषंगाने पुनर्रोपण केलेल्या वृक्षांच्या सद्यस्थितीबाबत उप वनसंरक्षक, पुणे यांनी वेळोवेळी भ्रमणध्वनीद्वारे पुणे महामेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., पुणे यांना कळविले असून पुनर्रोपण केलेल्या वृक्षांचा ताबा अद्यापपर्यंत वनविभागाने घेतलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील आरे वसाहतीत आगीच्या घटनेत वाढ झाल्याबाबत.

(२२) ३८५०८ (१०-०४-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे वसाहतीत पुन्हा आगीच्या घटना वाढत असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर व जानेवारी, २०२२ या कालावधीत उक्त परिसरात अनेकदा आगी लागल्या असून या आगी मुद्दाम झोपडपट्टीसाठी जागा मोकळी करण्याकरीता लावून झाडे नष्ट करण्याचा प्रयत्न होत आहे काय अशी शंका व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०८-२०२२) : (१) हे खरे नाही.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या ताब्यातील मौजे मरोळ, मरोशी, आरे व गोरेगाव मधील वनक्षेत्रात तसेच आरे दुग्ध वसाहतीच्या कार्यालयाच्या अधिपत्याखालील शासकीय जागेच्या परिसरामध्ये माहे डिसेंबर २०२१ वा त्यादरम्यान आगीची घटना घडलेली नाही. तथापि, माहे फेब्रुवारी, २०२१ ते मार्च, २०२१ या कालावधीमध्ये मुख्य अधिकारी आरे दुग्ध वसाहत यांच्या अखत्यातरीत असलेल्या परिसरामध्ये आगी लागल्याचे निदर्शनास येताच सदर आगी उपलब्ध सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या मदतीने तात्काळ विझविण्यात आल्या होत्या.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई पालिका रुग्णालयांमध्ये बनावट पदवी प्रमाणपत्रे सादर करणा-या बनावट प्रयोगशाळा तंत्रज्ञांकडून आर्थिक भुर्दंड वसुल करण्याबाबत

(२३) ३८५५७ (२५-०४-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पालिका रुग्णालयांमध्ये बोगस पदवी प्रमाणपत्रे सादर करुन वैद्यकीय सेवा देणाऱ्या सात प्रयोगशाळा तंत्रज्ञांना एक वर्ष आठ महिन्यांचा सेवा कालावधी पूर्ण केल्यानंतर माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये त्यांना काढून टाकण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कालावधीमध्ये पालिकेकडून त्यांनी घेतलेल्या वेतनाची एकूण रक्कम पाहता पालिकेला साठ लाख रुपयांचा भुर्दंड पडल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून या बोगस तंत्रज्ञांकडून आर्थिक भुर्दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) सदर ७ प्रयोगशाळा तंत्रज्ञांना नियुक्ती दिनांक १२.०१.२०१६ ते ३०.११.२०१७ या सेवा समाप्त कालावधीपर्यंत वेतनापोटी रु. ५२,८५,८८० इतक्या रकमेचे अधिदान करण्यात आले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर प्रकरणी वांद्रे पोलीस ठाणे येथे गु.र. क्र. ३२८/२०२० कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे, असे गृह विभागाने कळविले आहे.

तसेच सदर सात प्रयोगशाळा तंत्रज्ञांना नियुक्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उप प्रमुख अधिकारी (चौकशी) (परिमंडळ-३) यांचेमार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे. चौकशीअंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूरातून कोकणात जाणाऱ्या अंबा घाटात संरक्षण भिती नसल्याबाबत

(२४) ३८५७० (१८-०४-२०२२). कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरातून कोकणात जाणारा अंबा घाट हा धोकादायक वळणाचा घाट असून या घाटात ठिकठिकाणी संरक्षण कठडयांचा अभाव असल्याने अपघातांचे प्रमाण अधिक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघात वारंवार होत असतानाही शासनाने येथे संरक्षण कठडा बांधण्याबाबत कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) कोल्हापूरातून कोकणात जाणारा अंबा घाट हा रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ च्या रत्नागिरी-कोल्हापूर मधील भाग असून केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येतो.

सदरहू अंबा घाट हा धोकादायक वळणाचा असून सदयस्थितीत घाटातील सुमारे ७० टक्के लांबीमध्ये संरक्षक कठडे आहेत. सदर घाटामध्ये होत असलेले अपघात अनियंत्रित वाहन चालविणे,मद्यपान करुन वाहन चालविणे,वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे, धोकादायक वळणावर ओवरटेक करणे इत्यादी कारणांसह काही ठिकाणी संरक्षक कठडयांची आवश्यकता यामुळे होत असल्याने अपघातांचे प्रमाण अधिक असल्याचे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,कोल्हापूर यांनी कळविले आहे.

(२) आवश्यक ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपाचे संरक्षक कठडे तसेच पक्क्या स्वरुपातील (RCC Retaining Wall) संरक्षक कठडयाचे काम हाती घेऊन पूर्ण करण्यात आले आहे. याखेरीज रस्ते सुरक्षेच्या दृष्टीकोनातून आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,कोल्हापूर यांनी कळविले आहे.

(३) व (४) सदर ठिकाणच्या रत्नागिरी-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ चे चौपदरीकरणाचे काम प्रस्तावित असून त्यामध्ये रस्ते सुरक्षेच्या दृष्टीकोनातून आवश्यक सर्व बाबींचा समावेश करण्यात आला आहे. सदयस्थितीत सदर काम निविदा स्तरावर असून लवकरच कार्यारंभ आदेश देण्यात येऊन काम हाती घेण्यात येणार असल्याचे,प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,कोल्हापूर यांनी कळविले आहे.

वासिंद-कांबारे (जि.ठाणे) येथील रस्त्यांच्या कामास परवानगी मिळण्याबाबत

(२५) ३८६१४ (१०-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वासिंद-कांबारे रस्त्यावरील (जि.ठाणे) वांद्रे-पिवळी, सावरोली या चार- पाच किलोमीटर हद्दीतील रस्त्यांच्या दुरुस्तीला वन्यजीव विभागाची परवानगी मिळत नसल्याने सदर रस्त्यांचे काम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या रस्त्याच्या कामाला वन्यजीव विभागाची परवानगी न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरच्या रस्त्यांचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कांबारे-पिवळी रा.म.मा. ३ ते वाशिंद प्रजिमा-५७ रस्त्याची सुधारणा करणे या हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत कामामध्ये ३.४ कि.मी. रस्त्याची लांबी वन क्षेत्रातून जात असुन सदर रस्त्याचे काम करणेसाठी आवश्यक परवानगी प्राप्त झाल्यानंतर या लांबीत काम करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईमधील म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील पाणीपुरवठा मल्लनि:सारण वाहिनेचे उन्नतीकरणाबाबत

(२६) ४०००६ (१८-०४-२०२२). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील पाणीपुरवठा मल्लनि:सारण वाहिनीचे उन्नतीकरण व इतर सोयी-सुविधाविषयक कामे म्हाडा प्राधिकरणाने करावीत अथवा मुंबई महानगरपालिकेने करावी या संभ्रमामुळे म्हाडा वसाहतीमधील रहिवाशांचे अतोनात हाल होत असल्याने सदरची कामे करण्यासाठी म्हाडा प्राधिकरण की महापालिका या दोन्ही पैकी एका प्रशासनाची जबाबदारी निश्चित करून देण्याची लोकप्रतिनिधीनी शासनाकडे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त दोन्ही पैकी कोणत्या प्रशासनावर म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील सोयी- सुविधाविषयक कामे करण्याची जबाबदारी निश्चित केली आहे, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) गृहनिर्माण विभागाच्या दिनांक १८.०१.२०२१ रोजीच्या आदेशानुसार बृहन्मुंबईमधील म्हाडाच्या ५६ वसाहतींमधील मलनि:सारण वाहिनीचे व इतर सोयी-सुविधांविषयक कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेने करणे आवश्यक आहे.

सदर शासन निर्णयानुसार म्हाडा वसाहतींमधील पायाभूत सुविधांच्या उन्नतीकरणासाठीचे धोरण सन २०२१-२२ मध्ये पारित करण्यात आले असून, संबंधितांना मार्गदर्शक सूचना प्रसारीत करण्यात आल्या आहेत. तसेच, सन २०२२-२३ या वर्षात उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार व आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

दिनांक १७.०८.२०२१ रोजी मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहतींपैकी प्राधान्यक्रमाने टिळक नगर व नेहरु नगर या म्हाडा वसाहतीमधील काही ठिकाणी मलनि:सारण वाहिन्या टाकण्याची कामे आवश्यकतेनुसार हाती घेण्यात आली आहेत. तसेच काही रस्ते बांधणी व रस्ते पुनर्बांधणीची कामे हाती घेण्यात येणार आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यातील टीपेश्वर अभयारण्यमध्ये पर्यटन सुरु करण्याबाबत

(२७) ४०१९८ (१८-०४-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यातील टिपेश्वर अभयारण्यातील पर्यटन बंद असल्याने उपासमारीची वेळ आली असून, येथील पर्यटन तातडीने सुरू करावे, अशी मागणी जिप्सी चालक व गाईड्सनी शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष किशोर तिवारी यांच्यामार्फत शासनाला पाठविलेल्या निवेदनातून केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या दोन वर्षांपासून टिपेश्वर अभयारण्य पर्यटनासाठी बंद - चालू करण्यात येत असल्यामुळे जिप्सीचालक तसेच गाईड्स यांचा व्यवसाय बंद झाला असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विशेष म्हणजे येथे कार्यरत सर्व जिप्सीचालक तसेच गाईड्सनी कोरोना लसीचे दोन डोस घेतलेले आहेत. वास्तविक पाहता गावात सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. टिपेश्वर अभयारण्यात मात्र बाहेरच्या गर्दीच्या तुलनेत मोजकेच नागरिक पर्यटनासाठी येत असतात.असे असताना पुन्हा येथील पर्यटन बंद करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त परिसरातील हॉटेल्स व्यवसायावरही परिणाम होत असून हॉटेल्स धारक अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०८-२०२२) : (१), (२) व (३) मागील २ वर्षांमध्ये कोविड-१९ या विषाणुमूळे उद्धवलेल्या परिस्थितीमुळे राज्य शासनामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनान्वये वेळोवेळी राज्यातील सर्वच अभयारण्य, राष्ट्रीय उद्याने व व्याघ्र प्रकल्प पर्यटनासाठी सुरु करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

सद्यस्थित दिनांक ०२.०२.२०२२ पासून टिपेश्वर अभयारण्य पर्यटनासाठी सुरु करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

अकोला जिल्हयातील दहीहांडा फाटा ते किनखेड रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(२८) ४०३६३ (१९-०४-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील दहीहांडा फाटा ते किनखेड रस्त्याच्या निकृष्ट बांधकामाची चौकशी अधीक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ अमरावती यांचेकडून करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) उक्त प्रकरणी कामातील उणीव व त्रुटी क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून पूर्ण करून घेण्यास अधीक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ अमरावती यांना दिनांक १८ जानेवारी, २०२० चे पत्रानुसार अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ अकोला यांना निर्देश दिले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी अहवालात कोणत्या स्वरूपाच्या त्रुटी व उणीवा निदर्शनास आल्या असून त्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, अमरावती यांचा अहवाल मागविण्यात आला, हे खरे आहे.

(२) प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, अमरावती यांनी संबंधीत अधीक्षक अभियंता यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

(३) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, अमरावती यांनी दिलेल्या अहवालानुसार सदर रस्त्याच्या ६०० मीटर लांबीमध्ये खड्डे पडल्याचे, काही लांबीमध्ये रस्त्याचा पृष्ठभाग दबलेला असल्याचे तसेच साईड शोल्डर उंच असल्यामुळे डांबरी पृष्ठभागावर पाणी साचत असल्याचे निदर्शनास आले.

सदर मुद्यांच्या अनुषंगाने आवश्यक ती दुरुस्तीची कामे करून रस्ता वाहतूकीकरीता सुस्थितीत ठेवला आहे.

(४) याप्रकरणी दि.०८.०६.२०२० च्या शासन निर्णयातील कार्यपध्दतीचा अवलंब करुन पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

नांदूरा व मोताळा (जि.बुलढाणा) येथील रस्त्यांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(२९) ४०५७० (१९-०४-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदूरा व मोताळा (जि.बुलढाणा) या तालुक्याला जोडणा-या रस्त्यांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असून रस्ताकामासाठी परवानगीपेक्षा अधिक गौण खनिजाचे उत्खनन होत असल्याप्रकरणी माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे तक्रार केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीनुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्ह्यात पेठ गावाजवळील पुलाचे काम भूसंपादना अभावी रद्द झाल्याबाबत.

(३०) ४०७०७ (१९-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग खामगाव -चिखली- जालना (जि.बुलढाणा) या मार्गावरील पेठ गावाजवळील पुलाचे काम मंजूर होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम भूसंपादनाअभावी रद्द झाल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुलाचे काम रद्द होण्याअगोदर राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने वारंवार महसूल प्रशासनाला सांगूनही भूसंपादन करण्याबाबत कळवून ही भूसंपादन करण्यात आले नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भूसंपादन न होण्याची कारणे कोणती व किती दिवसांच्या कालमर्यादेत भूसंपादन करण्यात येणार आहे तसेच भूसंपदानाचे काम न होण्यास जबाबदार असलेल्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) प्रस्तावित पूलाचे ठिकाणी आवश्यक भूसंपादन न झाल्याने सदर काम कामाच्या वावातून (Scope of Work) मधुन वगळण्यात (De-scope) आले आहे.

(४) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधिल तरतुदीनुसार सदर भूसंपादन प्रकरणाबाबत कलम ३ A ते कलम ३ (G) पर्यंतची कार्यवाही विहित कालावधीमध्ये पूर्ण करण्यात आली असून प्रस्तुत प्रकरणात विलंब झाला नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही, असे महसूल व वन विभागाकडून कळविण्यात आले आहे.

सद्यस्थितीत भूसंपादन अधिकारी यांचेकडील प्राप्त निवाडा मंजूर स्तरावर आहे. याखेरीज सदर पूलाचे काम मंजुरीस्तरावर असून सदर मंजुरीच्या अधीन राहून निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील वर्सोवा येथील न्यू फिशरिज रोड (ऑफ यारी रोड) चे रुंदीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(३१) ४०७२४ (१८-०४-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वर्सोवा येथील न्यू फिशरिज रोड (ऑफ यारी रोड) चे रुंदीकरणाचे काम डीमार्केशन होऊनसुध्दा रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम अद्यापही प्रलंबित असल्यामुळे मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डीमार्केशन होऊन देखील अद्यापही महानगरपालिकेने हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१), (२), (३) व (४) मुंबईतील वर्सोवा येथील न्यु फिशरीज रोड (ऑफ यारी रोड) च्या १२० फुट रुंद रस्त्याचे रुंदीकरणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आले असून, सदर रस्त्याच्या डिमार्केशननुसार परिसरातील स्थानिक लोकांना होणारा त्रास पाहता बाधीत होणाऱ्या काही पात्र बांधकामधारकांना पर्यायी पुनर्वसन देऊन प्राधान्याने रस्त्याचा काही भाग मोकळा करण्यात आला आहे.

रस्त्यात बाधीत उर्वरित बांधकामांना पर्यायी पुनर्वसन दिल्यानंतर बाधीत बांधकामे निष्कासित करुन रस्ता पूर्ण रुंदीला विकसित झाल्यानंतर सदर ठिकाणी वाहतूक कोंडी होणार नाही. तसेच उर्वरित रस्ता मोकळा करण्यासाठी पात्र बाधीत बांधकामधारकांचे पर्यायी पुनर्वसन करण्याचे काम प्रगतीपथावर आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

रोहणा-वाढोणा-कारंजा व खरांगणा-मासोद-कोंढाळी-सेवाग्राम HAM अंतर्गत बांधकाम होत असलेल्या रस्त्याच्या गैरव्यवहाराबाबत.

(३२) ४०८१३ (१८-०४-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहणा-वाढोणा-कारंजा व खरांगणा-मासोद-कोंढाळी-सेवाग्राम HAM अंतर्गत रोड चे बांधकाम २०१८ पासून सुरू असून काम पुर्ण करण्याची मुदत २४ महिन्याची असताना आज ३६ महिन्यांचा कालावधी झाला असून फक्त कंत्राटदाराने ६०% काम केले असून कंत्राटदारास तिसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या बांधकामासाठी लागणाऱ्या साहीत्याचे वाहतुक पांजरा ते चोपन रस्त्यावरून करण्यात आल्यामुळे तो रस्ता पुर्णत: उखडला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्याच्या बांधकामामध्ये अनेक ठिकाणी साईड शोल्डर मध्ये मुरूमाऐवजी माती भरण्यात आली असल्याच्या तक्रारी करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या रस्त्यामधील वन विभागाच्या हद्दीत असलेल्या भागात रस्त्याचे बांधकाम अंदाजपत्रकानूसार करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, वरील सर्व बाबींची चौकशी करून कंत्राटदाराविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे व प्रकल्पाकरिता आवश्यक परवानगी प्राप्त करुन घेणेस लागलेला कालावधी या मुळे प्रकल्पाच्या प्रगतीवर परिणाम झाला आहे.

सद्यस्थितीत सदर प्रकल्पाचे ९२ % काम पूर्ण झाले असुन सदर प्रकल्पास तिस-यांदा मुदतवाढ देण्याची बाब सद्यस्थितीत शासनस्तरावर विचाराधीन नाही.

(२) पांजरा ते चोपन ग्रामा-१८ या रस्त्यालगत मुरुम खदान असल्याने, अवजड वाहतुकीमुळे सदर रस्त्याचा काही भाग क्षतीग्रस्त होतो. सदर रस्त्याची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येत असून रस्ता वाहतुकीकरीता सुस्थितीत आहे.

(३) नाही.

(४) वन विभागाच्या हद्दीतुन जाणा-या रस्त्याचे रुंदीकरण न करता अस्तित्वातील रस्त्याचे डांबरीकरणासह सुधारणा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

साक्री (जि.धुळे) वन क्षेत्रातील वन्य प्राणी गावातील पशुधनावर हल्ला करीत असल्याबाबत

(३३) ४१००७ (१८-०४-२०२२). श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील वन क्षेत्रातील वन्य प्राणी गावात व वस्त्यांमध्ये शिरुन शेतक-यांच्या गाई, म्हशी इत्यादी पशुधनावर हल्ला करित असल्याच्या घटना वारंवार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे मृत्यू झालेल्या ग्रामस्थांच्या कुटुंबियांना तसेच हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्याने पशुधनाचे नुकसान झालेल्या नागरिकांना शासनामार्फत नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी वन विभागाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०८-२०२२) : (१), (२) व (३) सन २०२१-२२ या कालावधीत साक्री तालुक्यामध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात पशुधन हानी झाल्याच्या ११९ घटना निदर्शनास आल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितांना रु. १६,६०,९४५/- इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

मानव वन्यप्राणी संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• वनक्षेत्रात तसेच वनक्षेत्राजवळच्या भागामध्ये दिवस-रात्र गस्त घालण्यात येते.
• मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने स्थानिकांमध्ये जनजागृती करण्यात येते.
• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी तसेच भक्ष्य उपलब्ध व्हावे याकरीता विविध उपाययोजना करण्यात येतात.
• क्षेत्रीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यात येते.

(४) प्रश्न उदभवत नाही.

चिंचोटी-माणकोली या रस्त्याची झालेली दूरवस्था

(३४) ४१०३० (३०-०३-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचोटी-माणकोली या रस्त्याची मागील पावसाळयात अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे का?

(२) असल्यास, सदर रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असून रस्त्यावरील खड्याची भरणा करत आहेत हे खरे आहे काय.

(३) असल्यास, सदर रस्ता सिमेंटचा बनविण्याबाबत व सदर रस्त्याच्या कामास केव्हापर्यंत सुरुवात होण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (२२-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) खाजगीकरणांतर्गत प्रकल्पाच्या सवलतकरारनाम्यातील तरतूदी नुसार आवश्यक त्या लांबीत काँक्रीटीकरण करण्यात आले असून रस्त्यावरील खड्डे वेळोवेळी भरुन रस्ता वाहतूकी करीता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे येडशी, (ता.जि. उस्माननाबाद) येथे वन अधिकारी, औरंगाबाद अंतर्गत केलेल्या वनक्षेत्रातील कामांचा दर्जा पडताळण्याबाबत

(३५) ४१०३४ (१८-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे येडशी, (ता.जि. उस्मानाबाद) येथे विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), औरंगाबाद अंतर्गत करण्यात आलेली कामे व त्यांचा दर्जा पडताळणी करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी लेखी पत्राद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वन क्षेत्र वाढविण्यासाठी केंद्र शासन, राज्य शासन व जिल्हा नियोजन समितीद्वारे प्रतिवर्षी मोठया प्रमाणात निधी दिला जात असून रामलिंग अभयारण्यातील वन्यजीव, औषधे वनस्पतीसह अनेक दुर्मिळ वृक्षांचे जतनव संवर्धन करण्यासाठी मोठया प्रमाणात निधी देण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हानियोजन समितीने दिलेल्या निधीच्या अनुषंगाने सदर कामास सुरुवात करण्यापूर्वी व काम पुर्ण झाल्यावर जिओ टॅगिग फोटो काढणे व ते जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करणे हे प्रशासकीय मान्यतेच्या अटी व शर्ती प्रमाणे बंधनकारक असूनही सदर जिओ टॅगिग फोटो औरंगाबाद यंत्रणेकडून जिल्हाधिकारी कार्यालयात जमा केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामामध्ये मोठयाप्रमाणात गैरव्यवहार झाल्यामुळे उक्त कामांची पडताळणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०८-२०२२) : (१) मौ. येडशी, ता. जि. उस्मानाबाद येथे विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), औरंगाबाद यांचे अंतर्गत करण्यात आलेली कामे व त्यांचा दर्जा पडताळण्याबाबत श्री. राणाजगजीतसिंह पाटील, वि.स.स. यांनी दिनांक ०७.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे मागणी केली होती.
(२) विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), औरंगाबाद यांचे कार्यक्षेत्रात येत असलेल्या येडशी रामलिंग घाट अभयारण्याकरीत सन २०२०-२१ मध्ये जिल्हा नियोजन समिती उस्मानाबादद्वारे रु. ३०९.४३ लक्ष तर केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत रु. ४.१८ लक्ष प्राप्त निधी खर्च करण्यात आला आहे.
(३) जिल्हा नियोजन समिती, उस्मानाबादद्वारे प्राप्त निधीमध्ये करण्यात आलेल्या कामांचे जिओ टँगिग फोटो वनपरिक्षेत्र अधिकारी, येडशी रामलिंग घाट अभयारण्य, येडशी यांनी दिनांक १७.०२.२०२२ रोजी सादर केले आहेत.
(४) विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक), उस्मानाबाद यांनी नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने कामांची मौका तपासणी केली असता सदर कामांमध्ये कोणतीही अनियमितता झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(५) प्रश्न उदभवत नाही.

मुंबईतील घाटकोपर पूर्व लक्ष्मीनगर येथील धोकादायक पुलावर होणाऱ्या वाहतुकीबाबत

(३६) ४१३०१ (१८-०४-२०२२). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुनील राणे (बोरीवली) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील घाटकोपर पूर्व आणि पश्चिम भागाला जोडणाऱ्या लक्ष्मीबाग पूल धोकादायक जाहीर झाल्यानंतर जवळपास सहा महिन्यानंतर नवीन पूल बांधण्याचा निर्णय झाला असून बांधकामाला सुरुवात करण्यात आली, मात्र पुलाच्या आजुबाजूची बांधकामे आड येत असल्याने कंत्राटदाराने काम थांबवले असून त्यावर कोणताही तोडगा न निघाल्याने सन २०१९पासून धोकादायक पुलावरून हलक्या वाहनांची वाहतूक सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घाटकोपर पूर्व पश्चिम जोडणारा, एल बी एस वरून पूर्व द्रुतगती महामार्ग, फ्री वे तसेच घाटकोपर अंधेरी लिंक रोड जाण्यासाठी हा पूल महत्त्वाचा असून पुल बंदी मुळे नागरिकांचा रोष वाढू लागल्याने महिन्याभरातच माहे जुलै, २०१९ मध्ये हलक्या वाहनांसाठी तो पुन्हा सुरू करण्यात आला असून तातडीची उपाययोजना म्हणून पुलाच्या पृष्ठभागावर लोखंडी प्लेट टाकण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन पूल उभारण्याकरिता सुमारे १८ ते १९ कोटीची आर्थिक तरतूद महापालिकेमार्फत करण्यात आली असून निविदा प्रक्रिया सुरू होऊन काम सुरू झाले. मात्र पुलाच्या आसपासची बांधकामे अडथळा ठरल्याने हे काम बंद पडले आहे. पुलावरून बेस्ट बस, स्कूल बस किंवा इतर जड वाहने जाण्यास बंदी आहे. या बस एलबीएस वरून एक ते दीड किलोमीटरचा फेरा मारून डेपो कडे जातात त्यात वेळ आणि इंधन या दोघांचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुलाच्या बांधकामाला अडथळा होत असलेल्या बांधकामांना स्थलांतरित करण्यासाठी महापालिकेने तसेच शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१), (२) व (३) घाटकोपर (पूर्व) येथील अंधेरी-घाटकोपर जोड रस्त्यावरील रस्त्यास छेदून वाहणाऱ्या लक्ष्मीबाग नाल्यावरील पुल मोडकळीस आल्याने सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हलक्या वाहनांकरिता तात्पुरत्या स्वरुपाचा पुल उभारण्यात आला आहे.

दिनांक १७.०२.२०२१ रोजी पुलाच्या दक्षिणेकडील २४ अनिवासी झोपड्यांचे निष्कासन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे. तसेच उत्तरेकडील ७ निवासी/अनिवासी बांधकामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासित करुन मोकळा भूभाग बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पुल विभागाच्या ताब्यात देण्यात आला आहे व सदर ठिकाणी पुल विभागामार्फत काम प्रगतीपथावर आहे.

तसेच स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार सदर पूल हलक्या वाहनांसाठी तसेच पादचाऱ्यांसाठी सुरु करण्याकरिता आय.आय.टी. मुंबई यांच्या सल्ल्यानुसार सदर पुलावर तात्पुरत्या स्वरुपाच्या लोखंडी तुळया व प्लेट्स टाकून सदर पूल लहान/हलक्या वाहनांसाठी व पादचाऱ्यांसाठी सुरु करण्यात आला आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर पुलाच्या उत्तरेकडील बाधीत बांधकामांचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत परिशिष्ट-२ तयार करण्यात आले असून, प्रारुप परिशिष्ट-२ व अंतिम परिशिष्ट-२ बांधकाम स्थळी प्रकाशित केले आहे.

तथापि, केंद्र शासन व राज्य शासनाने जाहीर केलेल्या लॉकडाऊनदरम्यान बांधकामांचे/झोपड्यांचे निष्कासन/निर्वासन न करण्याविषयीचे आदेश दिनांक २५.०३.२०२०, १५.०४.२०२० व दिनांक १५.०६.२०२० अन्वये दिले होते. त्यामुळे सदर कालावधीत पूल प्रकल्पबाधीत झोपड्यांचे/बांधकामांचे निष्कासन करणे शक्य झाले नाही. तद्पश्चात सदर पूल प्रकल्पबाधीत पात्र झोपडीधारकांना वितरीत करावयाच्या पीएपी वितरणाबाबतची कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण केली असून सदर बाधीत बांधकामांचे निष्कासन करुन सदर भूभाग दिनांक ०२.०५.२०२२ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूल विभागास हस्तांतरीत करण्यात आला असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

गडमुडशिंगीच्या (जि.कोल्हापूर) माळावर वनखात्याच्या पडीक इमारतीमध्ये जुगा-यांचा अड्डा झाल्याबाबत

(३७) ४१७४२ (३०-०३-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्गाच्या पलीकडे गडमुडशिंगीच्या (जि. कोल्हापूर) माळावर वनखात्याच्या १५ इमारती बांधल्यापासून म्हणजे २५ वर्षापासून पडून असून या इमारतीमध्ये आता जुगा-यांचा अड्डा झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनखात्याच्या या इमारती पडीक आहेत हे ही खरे आहे काय,याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३). नसल्याच, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०८-२०२२) : (१) व (२) मौजे मुडशिंगी येथे अधिकारी / कर्मचारी यांचेकरीता विविध प्रकारची १९ निवासस्थाने सन १९९२-९३ मध्ये बांधण्यात आली होती. सदर इमारतीमध्ये कोणीही अधिकारी / कर्मचारी न राहिल्याने किंवा वापरात न आल्याने सदर इमारती सद्यस्थितीत पूर्णपणे दुरावस्थेत असून राहण्यायोग्य नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तथापि या इमारती आता जुगाराचा अड्डा बनला असल्याची बाब खरी नाही.

गुडमुडशिंगी येथील निवासस्थाने ही वापरात राहणेसाठी वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर यांचे कर्यालयाने तत्कालीन अधिकारी / कर्मचारी यांना निवासस्थानाचे वाटप करण्यात येवून ताबा घेण्याबाबत सन २००० मध्ये आदेशित केले होते. परंतू संबंधित कर्मचाऱ्यांनी विनंती अर्ज करुन सदर निवासस्थाने शासनाने निश्चित केलेल्या मुख्यालयाच्या बाहेर आहेत, वीज, पाणी व गटार यासारख्या प्राथमिक सुविधा उपलब्ध नाहीत. तसेच निवासस्थाने ग्रामीण भागात असून कर्मचाऱ्यांचे आजारी वयोवृध्द कुटुंबियांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळणे शक्य होणार नाही, त्यामुळे त्यांनी वनसंरक्षक (वन्यजीव) बोरीवली यांना त्यांचे अडचणी विषयी लेखी निवेदन सादर केले होते. त्यानुसार सदर प्रकरणी वनसंरक्षक (वन्यजीव) बोरीवली यांनी शहानिशा करुन अधिकारी/कर्मचारी यांनी उपस्थित केलेल्या अडचणी योग्य आहेत, असे कळवून निवासस्थान वापराबाबत अधिकारी / कर्मचारी यांना सक्ती करु नये अशा सूचना देवून सदर निवासस्थाने ताब्यात देण्याच्या कार्यवाहीस स्थगिती बाबत कळविले होते.

सदर इमारतीचे नुतनीकरण करणे व पाणी व विद्युत जोडणी करुन पुर्नवापर करणेकामी अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर इमारतीचे नुतनीकरण होऊन इमारती राहण्यायोग्य झाल्यानंतर पुर्नवापर करणेकामी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

माटुंगा मुंबई येथील साई-सिध्दी सोसायटीत मॉक-ड्रील दरम्यान अग्निशमन जवानाचा झालेला अपघाती मृत्यू

(३८) ४२०६१ (२५-०४-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माटुंगा मुंबई येथील साई-सिध्दी सोसायटीत मॉक-ड्रील दरम्यान जखमी झालेले अग्निशमन जवान श्री.सदाशिव कार्वे वय ५५ यांचा अपघाती मृत्यू झाल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मॉक-ड्रील करताना केलेल्या निष्काळजीपणामुळे कार्वे यांना जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित मृत जवानांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत तसेच कुटुंबातील सदस्याला नोकरीची हमी देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) सदर दुर्घटनेसंबंधी झालेल्या अपघातास प्रथमदर्शनी यंत्रचालक श्री. संजीव मारुती जऱ्हाड यांचा निष्काळजीपणा दिसून येत असल्याकारणाने सदर यंत्रचालकास पुढील चौकशीसापेक्ष दिनांक २९.०१.२०२२ पासून निलंबित करण्यात आले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) सदर प्रकरणी उपप्रमुख अग्निशमन अधिकारी यांना चौकशी अधिकारी नेमण्यात आले असून, त्यांचेमार्फत सविस्तर चौकशी करण्यात येत आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) सदर प्रकरणातील मृत कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच, सदर मृत व्यक्तीच्या कुटुंबातील एका सदस्याला अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याबाबतची प्रशासकीय प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर सुरु करण्यात आली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद उजनी रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(३९) ४२०९३ (१८-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद-बेंबळी-उजनी या राज्यमार्गाचे काम संथ गतीने व निकृष्ट पद्धतीने होत असल्यामुळे हा रस्ता घातक बनला आहे व येथे सतत अपघात घडत असून सदर रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिक वारंवार मागणी करत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम हे अन्युईटी योजनेंतर्गत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक वर्षापासुन संथ गतीने चालु असलेल्या कामामुळे व कंत्राटदारांने मोठया प्रमाणात रस्ता खोदुन ठेवल्यामुळे या रस्त्यावर मोठया प्रमाणावर अपघात होऊन सर्व साधारण जनतेस आर्थिक व शारिरीक संकटांना तोंड द्यावे लागत आहे. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रस्त्याच्या अर्धवट कामामुळे झालेल्या जीवित व वित्त हानीची नुकसान भरपाई देण्याबाबत व वेळेत काम पूर्ण करून घेण्याबाबत संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे , नसल्यास, विलंबाची कारणे काय,

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) होय. हे खरे आहे.

(२) सदर काम हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत करण्यात येत आहे.

(३) व (४) हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत मंजूर एकूण ३७.२० कि.मी. लांबीपैकी २०.८० कि.मी. लांबीतील काम जुलै,२०२२ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. उर्वरित १६.४० किमी लांबी मध्ये स्थानिक शेतक-यांच्या मावेजा करिता प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे या लांबीत (मातीकामानंतरची) उर्वरित कामे हाती घेण्यात आलेली नाहीत. तथापि, सदर लांबीत डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरुन व मातीकाम झालेल्या भागात आवश्यक दबाई करुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे.

प्रश्नांकीत रस्त्याच्या लांबीत प्रगतीत असलेल्या कामामुळे अपघात झाल्याची नोंद नाही

आडेगांव पाटी ते आलेगाव खुर्द (जि.सोलापूर ता.माढा) येथील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(४०) ४२१३४ (१८-०४-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडेगांव पाटी ते आलेगाव खुर्द (जि.सोलापूर ता.माढा) येथील रस्ता साडेचार महिन्यापूर्वी केलेला असून सदर रस्ता खडीकरण न करताच तयार करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, तसेच या रस्त्यावर तब्बल साडेसहा कोटी रुपये खर्च करुनही हा रस्ता कोंढार पट्ट्यातील लोकांसाठी जीवघेणा ठरत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांच्या बेपर्वाइमुळे अवघ्या साडेचार महिन्यात शासनाचे तब्बल साडेसहा कोटी रुपयाचे नुकसान झाल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजीच्या वृत्तपत्रात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्या असून संबंधित उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांनी ठेकेदाराला काम करतांना अटी व शर्ती लावण्यात आल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निकृष्ट कामाबाबत ठेकेदारांवर कोणता गुन्हा दाखल केला असून याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती?

श्री. रविंद्र चव्हाण (१७-०८-२०२२) : (१) वृत्तपत्रात बातम्या आल्या होत्या, हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे,

नियमानूसार निविदा प्रक्रिया पुर्ण करून संबंधित कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

सदरचे काम करारनाम्याच्या अटी व शर्तीनूसार करण्यात आलेले आहे.

(३) नोव्हेंबर २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्त्याची क्षतीग्रस्त झालेली लांबी संबंधीत कंत्राटदाराकडून करारनाम्याच्या अटी व शर्तीनूसार दुरुस्त करून घेण्यात आलेली आहे. कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बोदवड तालुक्यात मुक्ताईनगर, बुरहानपूर व रावेर तालुक्यातील निंभोरा या रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपूलाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(४१) ४२२७१ (१८-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर) जळगांव अंतर्गत बोदवड तालुक्यात मुक्ताईनगर बुरहानपूर रस्त्यावरील सा.क्र.७५/८०० (रेल्वे सा.क्र.४७४/३२-१४ लेव्हल क्रॉसिंग नं.७) मध्ये रेल्वे उड्डाणपूलाच्या बांधकामाच्या कामाचा कार्यारंभ दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ असून तसेच रावेर तालुक्यातील निंभोरा येथील रेल्वे तालुक्यातील उड्डाणपूलाच्या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक ३० मार्च, २०२० रोजी श्री.बी.आर.भदाणे या कंत्राटदारांला देण्यात आले असून जवळपास ३ वर्षाचा कालावधी उलटूनही सदरील पूलांची कामे पूर्ण झाली नसल्याचे निदर्शनास आले असून सदर कामही निकृष्ट दर्जाचे असल्याबाबतच्या तक्रारी संबधितांकडे वारंवार करण्यात आल्या होत्या हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कामांची दक्षता व गुणवत्ता नियंत्रण विभागामार्फत चौकशी करण्यात आली आहे हे ही खरे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सद्यःस्थिती काय आहे व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) तक्रारी प्राप्त आहेत हे खरे आहे.

निंभोरा व बोदवड रेल्वे उड्डाणपुलाचे काम प्रगतीत असून जागेची उपलब्धता व कोविड महामारी या कारणास्तव कामांच्या भौतिक प्रगतीवर परिणाम झाला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदरची कामे कामाच्या करारनाम्यातील तरतूदीनुसार करण्यात येत आहेत. सदर कामात वापरण्यात आलेले सर्व बांधकाम साहित्याची वेळोवेळी प्रचलित मानकानुसार क्षेत्रिय प्रयोगशाळा व जिल्हा प्रयोगशाळा येथून तपासणी करण्यात आली असून चाचणी निष्कर्ष समाधानकारक आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कळंब –लातूर राज्य मार्ग क्रमांक २३६ ची सुधारणा करण्याचे काम कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर लि. इंदोर या कंपनीने विहित मुदतीत न केल्याबाबत

(४२) ४२३०१ (१८-०४-२०२२). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब –लातूर राज्य मार्ग क्रमांक २३६ ची सुधारणा करण्याचे काम कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर लि. इंदोर या कंपनीस सप्टेंबर,२०१९ मध्ये दिले असून सदर काम सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्या दरम्यान पूर्ण करण्याबाबतचा करारनामा झालेला असतांना काम मुदतीत पूर्ण न झाल्याने मुदतवाढ देण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपूर्ण कामामुळे तेथे ब-याचदा अपघात होऊन अनेकांचा मृत्यु झाला आहे व अशा घटना वारंवार घडत असून स्थानिक लोकप्रतिनिधिनी अनेक वेळा सूचना देऊनही काम अपूर्ण राहिले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कंपनीला दोन वेळेस मुदतवाढ देऊनही कामे पूर्ण केली नसल्याचे तसेच कामे पूर्ण न केल्याने कंपनीला दंड लावण्यात आला आहे, व कंपनीला काळया यादीत टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
तथापि, प्रगतीपथावरील कामामुळे काही प्रमाणात वाहतूकीस अडथळा निर्माण होत आहे.
(३), (४) व (५) कोविड चा प्रादुर्भाव या कारणास्तव सदर कामास दि. १२/०७/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्यामुळे कंत्राटदारावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील जोगेश्वरी येथील शहीद अशोक कामटे उद्यानाच्या सौदर्यीकरणाबाबत

(४३) ४२४१५ (१९-०४-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जोगेश्वरी येथील प्रभाग क्रमांक ७३, पूनमनगर, सेंट झेविअर्स शाळेच्या बाजुला बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून आकर्षक असे शहीद अशोक कामटे उद्यान उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी असलेल्या नैसर्गिक झऱ्यांचा वापर करून सदरहू उद्यानात तलावाची देखील निर्मिती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत काही महिन्यांपासून या उद्यानाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून उद्यानातील तलावात मोठया प्रमाणात गाळ साचला असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू उद्यानातील तलावातील गाळ काढून तलावा लगतच्या भिंतींची डागडुजी करून सदरहू तलावात आकर्षक कारंजे बसविण्यात यावेत तसेच या ठिकाणी नागरिकांकरिता बोटींगची सुविधा निर्माण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनूषंगाने या उद्यानाच्या सौदर्यीकरणाबाबत व स्वच्छतेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) तसेच सदरहू प्रकरणी होत असलेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर किती कालावधीत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) जोगेश्वरी येथील शहीद अशोक कामटे उद्यान सन २००८ मध्ये म्हाडाने विकसित करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केले आहे.
सदर उद्यानाचे परिरक्षण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत केले जात आहे असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर उद्यान हे सद्य:स्थितीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या कंत्राटदारामार्फत व्यवस्थितरित्या परिरक्षित केले जात आहे.
तसेच, सदर उद्यानातील तलाव हा नैसर्गिक तलाव असून, सद्य:स्थितीत सदर तलावात गाळ साचलेला नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) हे खरे आहे.
(५) कोविड कालावधीतील व्यवस्थापनावर झालेल्या प्रचंड खर्चामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे उपलब्ध निधीचा विचार करुन यावर्षी सुचविलेल्या कामांपैकी अत्यंत दुरावस्था असलेल्या उद्यानांची प्राथमिकतेने कामे सुरु करण्यात येत आहेत.

सदर उद्यान सद्य:स्थितीत तुलनात्मकदृष्टया सुस्थितीत असल्याने पुढील टप्प्यांमध्ये याचा अंतर्भाव करण्यात येईल असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

कामोठे (नवीमुंबई)येथील एस टी पी प्लॉट (नवी मुंबई) संदर्भात सिडकोच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(४४) ४३१३२ (०९-०४-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामोठे (नवी मुंबई) येथील एस टी पी प्लॉट संदर्भात सिडकोच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र शहर विकास आणि औद्योगिक विकास महामंडळ, निर्मल भवन, मुंबई यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र न घेता हा प्लांट चालवित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या तक्रारीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (०२-०९-२०२२) : (१) हे खरे आहे
(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडून संमती प्रमाणपत्र (Consent to Establish) हे पूर्ण बांधकाम कालावधीकरीता दिले असून, सांडपाणी संयत्राचे (एस.टी.पी.) काम प्लांटचे बांधकाम फेब्रुवारी २०१२ मध्ये पूर्ण झाले आहे.

मैला / सांडपाण्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक असल्याने ई-निविदा पध्दतीने Operation and Maintenance चे कंत्राट कामे देण्यात आले आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या दि.०२.०२.२०१६ च्या Consent to Operate प्रमाणपत्रानुसार दि.३१.१२.२०१६ पर्यंत संमती देण्यात आली आहे. त्यापुढील कालावधीसाठी मान्यता प्रमाणपत्र (Consent to Operate) दि.०४.०४.२०२२ रोजी प्राप्त झाली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

भुसावळ तालुक्यातील रस्त्यांची कामे विहित मुदतीत न केल्याबाबत

(४५) ४३४११ (१८-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ तालुक्यातील रस्त्यांची कामे मे.भारती कन्स्ट्रक्शन यांनी कामाची मुदत संपून सुध्दा विहित वेळेत पूर्ण केलेली नाहीत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामाबाबत दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास कुर्हे गावाच्या नागरिकांनी कंत्राटदाराविरुध्द आंदोलन केली आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रस्त्यांच्या कामाची गुणवत्ता व कामात दिरंगाई होत असल्याने कंत्राटदाराविरुद्ध वारंवार स्थानिक लोकप्रतिनिधीनी तक्रार करूनही अद्यापी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही हे खरं आहें काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

सदर कामाच्या करारनाम्यातील तरतूदी प्रमाणे संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली (प.), मुंबई येथे न्यूरो विभाग सुरु करण्याबाबत

(४६) ४३४७० (३१-०३-२०२२). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली (प.), मुंबई येथे न्यूरो विभाग सुरु करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.पालकमंत्री, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) कांदिवली (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयाच्या आवारातील रिकाम्या भूखंडावर ३२५ खाटांचे सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचा प्रकल्प उभारण्यात येत असून त्यामध्ये न्युरो मेडिसीन विभागाच्या १९ खाटा आणि न्युरो सर्जरी विभागाच्या १९ खाटांव्यतिरिक्त अतिदक्षता विभागाच्या ११ खाटा व १ मॉडयुलर ऑपरेशन थियटर उभारणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा जिल्हयात हॅम योजनेअंतर्गत शासनाने केलेल्या रस्त्याच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

(४७) ४३६६८ (१०-०४-२०२२). श्री.राजू कारेमोरे (तुमसर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयातील तुमसर-मोहाडी विधानसभा क्षेत्रातील जांब ते खडकी व गोबरवाही ते तुमसर, देव्हाडी या रस्त्याची कामे करण्यात येवून त्यासाठी अंदाजे रक्कम रुपये ५०० कोटी इतका खर्च करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार हॅम योजनेअंतर्गत रस्ता, नाले, पथदिवे CD वर्क, बसस्टॉप व इतर कामे करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची कामे करतांना निकृष्ट दर्जाचे डांबरी रस्ते, गावांतील रस्ते व नाल्या निकृष्ट दर्जाचे असून सर्विस रोड, पथदिव्यांची कामे, शेती रस्त्याची कामे व अन्य कामे देखील निकृष्ट दर्जाची असल्याबाबत तेथील नागरीकांनी शासनाकडे अनेकदा तक्रारी केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्त्याची कामे करणाऱ्या कंत्राटदारावर व कंपनीविरुध्द सखोल चौकशी करण्यात यावी अशी नागरीकांच्या तक्रारीवरुन मा.लोकप्रतिनिधीनी दिनांक ३ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या पत्रान्वये मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने सदर मागणीनुसार त्याप्रकरणी सखोल चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित ठेकेदारांविरुध्द व शासकीय अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१८-०८-२०२२) : (१) भंडारा जिल्ह्यात हायब्रीड ॲन्युईटी योजनेअंतर्गत दोन कामे पूर्ण झालेली आहेत.
१) HAM NAG-१३२ जांब-खडकी-लाखनी-मानेगाव-पालांदुर रस्ता रामा ३६१ (प्रकल्प किंमत रु. ११९.०८ कोटी)

२) HAM NAG-१३३ गोबरवाही-तुमसर रस्ता रामा ३६० (प्रकल्प किंमत रु. १९१.५२ कोटी)
सदर दोन्ही प्रकल्पांतर्गत सद्यस्थितीत रु. २९१.२८ कोटी इतका खर्च झालेला आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) व (४) तक्रारी व निवेदने प्राप्त आहेत.

(५) सदर चे काम स्वतंत्र अभियंता यांच्या देखरेखीत करण्यात आले असून कामाची गुणवत्ता शासनाच्या वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार राखण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दक्षता व गुणनियंत्रण विभागाकडून सुद्धा निरीक्षण दौ-यात गुणवत्ता तपासण्यात आली असून सदर रस्त्याची कामे Std. Specification नुसार व चांगल्या गुणवत्तेची झालेली आहेत. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण (जि. ठाणे) येथे अल्पसंख्यांक समुदायाच्या विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी नवीन वसतिगृह मंजूर करणेबाबत

(४८) ४३६७४ (०४-०४-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथे अल्पसंख्यांक समुदायाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी शासकीय वसतीगृह नसल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची प्रचंड गैरसोय होत असल्याचे दिनांक ०१ जानेवारी,२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील कल्याण हे प्रमुख शैक्षणिक केंद्र असल्याने अल्पसंख्यांक समुदायाच्या विद्यार्थी विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र शासकीय वसतीगृह मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०८-२०२२) :(१) नाही

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील पर्यटनक्षेत्र मलंग गडावरील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत...

(४९) ४३८११ (३०-०३-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ जि.ठाणे तालुक्यातील पर्यटनक्षेत्र मलंगगडावर दरवर्षी लाखो पर्यटक भेट देत असून पर्यटनाच्या अनुषंगाने सदर मलंगगडावर व त्या परिसरात कोणत्याही सुविधा नसल्याचे बाब दिनांक ०१ जानेवारी २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यटनाला चालना मिळण्याच्या अनुषंगाने मलंगगड विकसित करण्याबाबत कोणत्या उपाययोजना राबविण्यात आल्या आहे काय,

(३) असल्यास, अंबरनाथ जि.ठाणे तालुक्यातील पर्यटन क्षेत्र मलंग गडावरील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

श्री. रविंद्र चव्हाण (२२-०८-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) हाजीमलंग परीसरात बस स्थानकाजवळ स्वच्छता गृह बांधणे, निवारा शेड तयार करणे, भक्त निवास बांधणे, पायऱ्या व सुरक्षा रेलिंगचे काम करणे या कामाकरीता जिल्हा नियोजन समितीमार्फत पर्यटन स्थळ विकास करणे अंतर्गत मार्च, २०२२ मध्ये रु. ५५० लक्ष रक्कमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर

कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर येथील विविध विकास कामांना अल्पसंख्यांक विभागामार्फत निधी मिळण्याबाबत

(५०) ४३८७३ (०४-०४-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर येथील उल्हासनगर नंबर २ व ३ येथील स्मशान भूम मध्ये विद्युत दाहिनी बसविण्याबाबत व मुस्लिम बहुल असलेल्या भागात विविध विकास कामे करण्यासाठी अल्पसंख्याक विभागाने निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी मा. लोकप्रतिनिधींनी अल्पसंख्यांक विभागाकडे दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी वा त्या सुमारास केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अल्पसंख्यांक समितीचे उप सचिव यांनी दिनांक ५ एप्रिल, २०२१ रोजी वा त्या सुमारास याबाबतचा अहवाल अपर मुख्य सचिव अल्पसंख्यांक विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पाठवला आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत सादर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात संबधीत लोकप्रतिनिधी आणि अल्पसख्यांक समिती प्रमुख यांना पाठविण्याचे निर्देश दिले असतानाही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही तसेच याबाबतची मा. लोकप्रतिनिधी यांना देण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) राज्यातील नागरी भागात वास्तव्यास असलेल्या अल्पसंख्याक लोकसमुहातील नागरीकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावण्याकरीता अल्पसंख्याक बहुल वस्तीत मुलभूत/पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता शासन निर्णय दि.१८ जुन, २०१५ व शासन पूरकपत्र दि.९ मार्च, २०१६ अन्वये अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत महानगरपालिकांना कमाल रु. २० लाख, “अ” वर्ग नगरपालिकांना कमाल रु. १५ लाख तर “ब” व “क” वर्ग नगरपालिकांना कमाल रु. १० लाख इतके अनुदान रस्ते, पाणी, वीज, कब्रस्तान वॉल कंपाउंड व अंतर्गत सुविधा इ. कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो. या योजने अंतर्गत संबंधित जिल्हाधिकारी व लोकप्रतिनिधी (आमदार व खासदार) यांच्याकडून प्राप्त निधी मागणीचे जवळपास रु. ३०० ते ४०० कोटी निधीमागणीचे प्रस्ताव दरवर्षी प्राप्त होत असतात. वित्त विभागाकडून प्रत्यक्ष प्राप्त निधी व कामाची आवश्यकता यानूसार सदर विकास कामांना निधी वितरीत करण्यात येतो. सन-२०२०-२१ या वर्षामध्ये या योजनेकरीता रु.४३.९२ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. त्यापैकी ५० टक्के प्राप्त निधी रु. २१.९६ कोटी वितरीत करण्यात आलेला आहे.
५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.